# संत तुकाविप्र रचीत दीवाळीचे अभंग

दीवाळीचे सणी थेर । मुर्ख नर पाहाती
श्रेष्ठ साधन करावे । भक्ती भावे या सणी
थेर पहाणे थोरीव । गाठी पाप म्हणोनि
पाप घडेल जे घडी । साची जोडी तेधवा
संतापुढे जमीदारी । परोपरी दावीती
तुकाविप्र म्हणे मूढ । साचे द्वाड ते नर

सण दिवाळीचा गोड । तो उघड कीर्तने
हरीनाम कथा जेणे । शोभा सणे दिवाळी
धन्ये त्याचे कूळ धन्ये । जे कीर्तनी रंगले
वेद श्रुतीचीया मते । कली सत्य कीर्तन
जेथ घदेल हा रंग । पांडुरंग ते ठाई ।
तुकाविप्र म्हणे सणी । य रंगणी असावे

असो कसा कोणी आता । आम्हा कथा हरीची
तारु प्रमाण वेदांती । आम्हा चित्ती तो प्रेमा
हरी गूण कथा सार । आम्हा थोर कलीत
गती दुसरी ना मीळे । तुर्त काले कलीत
तुकाविप्र म्हणे ऐसी । दिवाळीसी घटीका

शुद्ध कार्तिक पाडवा ।सण देवादिकाचा
तया सणी वाळवंटी । भक्त भेटी देवाची
कृष्ण वेण्या वाळवंट । हे अविट सर्वस्वे
तेथे विनंती सर्वेशा । भक्त आशा पुरवी
देई सदविद्या सुमती । क्षमा शांती भावार्थ
भीड चाड इतराची । नको साची सहसा
तुकाविप्र म्हणे दया । देवराया करावी

सोनियाचा दीन आजी हा घडला । सणी साधू आला संत घरा
श्रोता कीर्तनासी दीवाळीचे सणी । आला वोवाळणी साधावया
इडा पिडा गेली जालो बळीयादे । ब्रीदावळी गाढे अनुभवे
तुकाविप्र म्हणे सर्वांगे उजळे । कीर्तन कल्लोळे जाला आजी